**-: प्रेस नोट :-** **दिनांक ०७/०१/२०२५**

## लो.टी.मार्ग पोलीस ठाणे मुंबई येथे दाखल घरफोडी गुन्हयातील आरोपीतास २४ तासाच्या आत अटक करुन संपुर्ण मालमत्ता हस्तगत केले बाबत

दि. ०६/०१/२०२५ रोजी फिर्यादी श्री रोहित अनंतराय व्यास, वय ५५ वर्षे यांनी समक्ष पोलीस ठाणे येथे येवुन त्यांच्या डायमंड मेन्शन बिल्डींग, काळबादेवी रोड, मुंबई या ऑफिसमधील पॅन्ट्री कम स्टोअर रूमच्या एक्झॉझ फॅन काढुन अडगळीच्या जागेमधुन प्रवेश करून ऑफिसच्या कॅबिनमधील लोखंडी कपाटाचा दरवाजा तोडुन त्यामधील तिजोरीमध्ये ठेवलेल्या रोख रू. ३०,००,०००/- चोरी केली म्हणुन लो.टि.मार्ग पोलीस ठाणे गु.र.क्र. ११/२०२५ कलम ३३१(३),३३१(४), ३०५ भा.न्या.सं. अन्वये दिनांक ०६/०१/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

लो.टी.मार्ग पोलीस ठाणेच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाचे स.पो.नि. भंडारे,स.पो.नि.प्रशांत कांबळे, पोउपनि रुपेश पाटील व गुन्हे प्रकटीकरण पथकाने तात्काळ गुन्हयाच्या घटनास्थळी जावुन शोध घेतला असता कोणतेही सीसीटिव्ही फुटेज उपलब्ध नसतांना, तांत्रिक तपास व पारंपारिक मानवी कौशल्याचा वापर करुन तसेच गुप्त बातमीदार यांच्या माहिती वरुन नमुदचा गुन्हा हा सराईत गुन्हेगार फिरोज मोहम्मद गौसुद्दीन शेख याने केला असल्याचे निष्पन्न केले.

सदरवेळी पाहीजे आरोपीताबाबत अधिक माहीती प्राप्त करीत असताना गुप्त बातमीदारांनी पाहिजे आरोपी फिरोज मोहम्मद गौसुद्दीन शेख हा दि. ०६/०१/२५ रोजी मुंबई येथुन रेल्वेने त्याच्या मुळगावी उधवा, झारखंड येथे पळुन गेला असल्याबाबत माहिती प्राप्त झाली. सदर माहीतीच्या आधारे तात्काळ गुन्हे प्रकटीकरण अधिकारी व पथक हे कोलकत्ता, पश्चिम बंगाल येथे रवाना झाले. नमुद पथकाने हावडा रेल्वे स्टेशन व परिसरात अंत्यत कुशलतेने व बारकाईने तपासणी केली असता, सदर पाहीजे आरोपी हा मिळुन आल्याने त्याने चोरी केलेल्या संपुर्ण मालमत्तेसह ताब्यात घेवुन पोलीस ठाणेस आणण्यात आले.

नमुदचा गुन्हा घडल्यापासुन २४ तासाच्या आत नमुद गुन्हयामध्ये पाहीजे आरोपीतबाबत कोणताही पुरावा तसेच घटना कधी घडली याबाबत कोणतीही खात्रीलायक माहीती व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नसताना पारंपारिक मानवी कौशल्याचा वापर करुन पाहीजे आरोपीताबाबत उपयुक्त माहीती प्राप्त करुन सदरचा गुन्हा उघडकीस आणलेला आहे.

सदरची उल्लेखनीय कामगिरी ही श्री अनिल पारसकर, मा. अप्पर पोलीस आयुक्त, मध्य प्रादेशिक विभाग, (अतिरीक्त कार्यभार दक्षिण प्रादेशिक विभाग) मुंबई, डॉ. मोहित कुमार गर्ग, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, मुंबई, श्री. विजय डोळस, सहायक पोलीस आयुक्त, पायधुनी विभाग, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.नितिन तडाखे, पो.नि.चंद्राकांत सरोदे, पो.नि.अमोल काळे, यांच्या अधिपत्याखालील स.पो.नि.राहुल भंडारे, स.पो. नि. प्रशांत कांबळे, पोउनि रुपेश पाटील, पो. अंमलदार सागर विचारे, समिर परुळेकर, प्रफुल पाटील,राजकुमार कांबळे, ज्ञानेश्वर सानप,शरदचंद्र साटम, संदिप वाकचौरे, बाळु शेंडे, संदिप वाक्से, दत्तात्रय सातपुते, गजानन बगळे, अनिल सांळुके, अविनाश जोशी यांनी पार पाडली.